सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महत्वाचे**

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/स्कूलकनेक्ट/२०२५/3477
दिनांक :- 26 DEC 2025

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित पदविका,
अभ्यासक्रमाच्या संस्था, अमरावती विभाग,
अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होणाच्या अनुषंगाने विविध उपक्रमांव्दारे प्रसिध्द करणेबाबत..**

**संदर्भ :-**१. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/पदविका-मा.प्रवेश/स्कूल कनेक्ट/२०२६-२७/५०२, दि.२८.१०.२०२५

२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/पदविका-मा.प्रवेश/स्कूल कनेक्ट/२०२६-२७/५६३, दि.२३.१२.२०२५

उपरोक्त विषयाबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने स्कूल कनेक्ट उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत आपणास कळविण्यात आलेले होते.

सदर स्कूल कनेक्ट उपक्रम राबवितांना, शाळेतील प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थ्यांबाबत माहिती संकलित करुन सदर माहिती संस्थास्तरावर जतन करुन सविस्तर डेटाबेसच्या स्वरुपात वेळोवेळी मंडळाच्या (MSBTE) संकेतस्थळावर अपडेट करण्याबाबतही कळविण्यात आलेले होते. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ प्रवेशप्रक्रियेच्या अनुषंगाने स्कूल कनेक्ट उपक्रमांतर्गत जवळपास ४.५० लक्ष विद्यार्थ्यांची माहिती मंडळाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिताच्या प्रवेशप्रक्रियेसाठी सदर उपक्रम ३ नोव्हेंबर २०२५ पासून सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले होते. संचालनालय स्तरावरुन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता स्कूल कनेक्ट उपक्रमाचा आढावा घेतला असता, उपक्रम सुरु होवून जवळपास दिड महिना झालेला आहे तरी, आज रोजी फक्त १.६३ लक्ष विद्यार्थ्यांची माहिती अपलोड होणे गंभीर आहे. याबाबत आपल्या स्तरावरुन कामाचा पुरेसा पाठपुरावा करण्यात आलेला नसल्याचे निदर्शनास येते व याबाबत मा.संचालक यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.

सर्वसाधारणतः इयत्ता दहावीत प्रवेशित विद्यार्थ्याची मंडळाची परिक्षा फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवडयात घेण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शाळेच्या संपर्कात राहण्याचा कालावधी अत्यंत कमी राहिला आहे. त्यामूळे सदर उपक्रमासाठी आपण अधिकाधीक परिश्रम घेवून स्कूल कनेक्ट उपक्रमाव्दारे पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. याबाबत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची मंडळाच्या संकेतस्थळावर माहिती अपलोड करण्यात यावी. तसेच संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रातील मार्गदर्शक सूचना विचारात घेण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

**(डॉ. व्हि. आर. मानकर )**
प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर /ईमेल टाकण्याकरीता.

487